PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 6

# शैक्षणिक संशोधनातील गुणात्मकता

**डॉ. एस. एन. बरडे**

सहयोगी प्राध्यापक

जनता शिक्षण महाविद्यालय चंद्रपूर

**(महाराष्ट्र) भारत**

शिक्षकाने आपली व्यावसायिक गुणवत्ता वाढविण्यासाठी, व्यवसायाशी संबंधित समस्यांच्या निराकरणासाठी संशोधकीय वृत्ती जागृत ठेवली पाहीजे. गुणवत्तापूर्ण शिक्षकाला नेहमी अनेक समस्या भेडसावित असतात. कधी आपल्या अध्यापन विषयाच्या, कधी अध्यापन तंत्राच्या, कधी विद्यार्थ्यांच्या तर कधी शिक्षण व्यवस्थेशी संबंधित अनेक समस्या आ वासून उभ्या असतात. आज मानवी कर्तुत्वाच्या सर्वच क्षेत्रात संशोधन चालू आहे. ज्ञानाचे क्षेत्र विस्तारण्यासाठी, मानवी समस्यांचे आकलन व निराकरण करण्यासाठी, मानवी जीवनात सुख, शांती, समृद्धता आणण्यासाठी संशोधन महत्वाची भूमिका बजावते. संशोधनाच्या अनेक व्याख्या आहेत. पण आपण सोपी व सुटसुटीत व्याख्या घेवू ." संशोधन म्हणजे वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषयाचा बारकाईने केलेला समीक्षात्मक अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकित्सा होय." ऐकोणविसाव्या शतकाच्या पुर्वार्धात मानसशास्त्राचा आधार घेवून शैक्षणिक क्षेत्रातील संशोधनांना सुरवात झाली असे आढळते. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर जसजशी शिक्षणात उत्क्रांती होत गेली, शिक्षण क्षेत्राची व्यापकता वाढली व ह्या क्षेत्रातील संशोधनाची गतीही वाढली परंतु हेच प्रमाण स्वातंत्र्यप्राप्त होण्यापूर्वी नगण्य होते. शैक्षणिक संशोधनात इतर शास्त्र जसे मानसशास्त्र, समाजशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र वगैरेचा प्रभाव पडायला सुरवात झाली.

संशोधन करणे हे एक आव्हान असते. प्रत्येक व्यक्तित संशोधकिय वृत्ती असेलच असे नाही. संशोधन करण्याठी वैज्ञानिक दृष्टीकोन असणे गरजेचे आहे. शिक्षकाकडे तर तो नक्की असावाच. वैज्ञानिक



VOL 5, ISSUE 6 www.puneresearch.com/scholar DEC 19 TO JAN 2020
(IMPACT FACTOR 3.14 IIJIF) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL JOURNAL

दृष्टिकोनाचा अभाव असणारे शिक्षक जाणीवपूर्वक प्रयत्न करून स्वतःमध्ये असा दृष्टिकोन निर्माण करू शकतात.

संशोधन करू इच्छिणाऱ्या व्यक्तिमध्ये संशोधना विषयी अभिक्षमता असली पाहीजे. त्यांच्यामध्ये संशोधनाची प्रेरणा निर्माण झाली पाहीजे. वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या आधारे शिक्षकाला भेडसाविणाऱ्या समस्यांची उकल शिक्षकाला करता आली पाहीजे. फक्त आचार्य पदवी प्राप्त करून समाजात मिरविण्याची त्याची वृती नसावी.

संशोधनाचा मुख्य हेतू नवे ज्ञान प्राप्त करणे, विद्यमान तथ्याबद्दल नवीन दृष्टीकोन प्रस्तुत करणे, घटनांचे विश्लेषण करून त्यातील संबंध नव्याने प्रस्थापित करणे, ज्ञान वाढवून मानवाच्या प्रगतीला पोषक परिस्थिती निर्माण करणे होय.

संशोधनातील गुणत्मकता :

शैक्षणिक संशोधनात गुणात्मकता आणण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक असतात. संकल्पना व प्रतिकांची हाताळणी, सिद्धांताचा पडताळा पाहणे, समस्येचे समाधान शोधणे, समान्यीकृत निष्कर्षाची, तत्वांची पुनर्तपासणी करणे, परिकल्पनांचे परिक्षण करणे, वर्तमान ज्ञानात सुधारणा करणे, निरीक्षण आणि पडताळा पाहता येईल अशा तत्वांचे सहेतुक संचयन करणे, संचयनात अचुकता, व्यापकता, सार्थकता आहे का हे पाहणे, घटना प्रसंग यांचे विश्लेषण करणे, अपवादात्मक तर्काकडे लक्ष देण्याची सवय व विश्वसनिय मापन साधनांचा उपयोग केला पाहीजे.

सद्यस्थितीत होणारी शैक्षणिक संशोधने ही संख्यात्मक संशोधने आहेत. अशा प्रकारची संशोधन हे मुख्यतः विद्यापीठाची पदवी प्राप्त करण्याकरिता किंवा मिळणाऱ्या वेतनात आर्थिक वाढ होण्यासाठी म्हणून करण्यात येतात. अशा प्रकारच्या संशोधनामध्ये गुणात्मकतेचा लवलेश ही नसतो. ज्याप्रकारे पाश्च्यात्य राष्ट्रांमध्ये मूलभूत स्वरूपाच्या संशोधनावर भर दिलेला आढळतो तसा आपणाकडे आढळत नाही. उपयोजित संशोधन प्रकारातून प्राप्त होणारे निष्कर्ष समाज प्रगतीसाठी किंवा सुधारणेसाठी करण्यात येतात परंतु त्यातही संशोधकीय समाधानाचा अभाव आढळतो. उच्च शिक्षणात जी काही शैक्षणिक संशोधन होतात त्यांच्या निष्कर्षांचा आपल्या देशाच्या प्रगतीसाठी किंवा सामाजिक विकासासाठी किती उपयोग होतो? हा सुद्धा एक संशोधनाचा विषय होवू शकतो. विद्यापीठांमध्ये होणारी संशोधने ही गुणवत्तापूर्ण नसून संख्यात्मकता दर्शवणारी असतात असेच म्हणावे लागेल. संशोधनातील गुणात्मकता कशी टिकेल या दृष्टीने विद्यापीठांमध्ये आता सुरवात झालेली आहे. आता संशोधनाचा शोध सादर करतांना चसंहपंतपेउ जमेज (प्लॅगॅरिसम टेस्ट) करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे कुणीही दुसऱ्यांच्या प्रबंधाची कॉपी किंवा चोरी करू शकत नाही. विद्यापीठ अनुदान आयोग संशोधन कार्यात गुणात्मकता टिकविण्यासाठी प्रयत्नशील आहे. नक्कीच येणाऱ्या काही वर्षात संख्यात्मक संशोधनाची संख्या कमी होवून गुणात्मक संशोधन वाढीस लागेल अशी आशा

करायला हरकत नाही. संशोधनाचा दर्जा ठरविण्यासाठी उच्चस्तरीय शैक्षणिक संस्था प्रयत्नशील आहे, नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून संशोधनातील गुणात्मकता वाढीस लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

आजच्या जागतिक शैक्षणिक व्यवस्थेत आपल्या शैक्षणिक संस्थाचे स्थान उच्च स्थानावर आणायचे असेल तर गुणात्मक संशोधनास प्रोत्साहन द्यावे लागेल. संशोधनात गुणात्मकता आणण्यासाठी कठोर नियम करून उद्म संशोधन करणाऱ्यांना थांबविल्या गेले पाहीजे. संशोधनातील नवीन प्रवाह आणि समाजाच्या, देशाच्या शिक्षण विषयक गरजा यांचा मेळ घालून गुणात्मक संशोधनाच्या आधारे अध्ययन अध्यापन क्षेत्राचा विकास करता येईल. गुणात्मक संशोधनाच्या आधारे प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचा, निष्कर्षाचा शिक्षण व्यवस्थेतील विविध समस्यांची उकल करण्याकरिता उपयोग करता येईल.

सद्यस्थितीत आपण सर्व एकविसाव्या शतकात पुर्वार्धाच्या जवळपास मध्यावर आहोत. या स्पर्धेच्या युगात संशोधनातील गुणवत्ता टिकवायची असेल तर संशोधकाला संशोधकीय गुणवत्तेसाठी नवीन विचारांना स्वीकारावे लागेल. या नवनवीन विचारांचा स्वीकार करतांना आपली सांस्कृतीक मूल्ये, नवीन तंत्र व पद्धती यांचा सुयोग्य व सक्षमतेने मेळ घालता आला पाहीजे असे केले तरच संशोधनातील गुणवत्ता जोपासण्यासोबतच मूल्यांची पण जोपासना होईल आणि शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुद्धा वाढीस लागेल.

## संदर्भसूची :

1) www. mhrd. gov. in

2) www. ncert. mic. in

3) www.indiatoday.in